**Tarun Bharat, Nagpur, Sep 02 2012**

# टीसीएस आयटी वित्झ : सेंटर पॉईंट शाळा विजयी

तभा वृत्तसेवा

नागपूर, १ सप्टेंबर

टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेसतर्फे आयोजित करण्यात आलेल्या आयटी वित्झ स्पर्धेत अंतिम फेरीमध्ये सेंटर पॉईंट शाळेचा परितोष कान्हे आणि अनिरुद्ध मोरारका यांनी बाजी मारली आणि विजेत्यांसाठी असलेल्या चषकाचे आणि प्रत्येकी एका गॅलक्सी नोटचे मानकरी ठरले.

यासोबत डीपीएस शाळेच्या अभिषेक अंबुलकर आणि अबु बकर सी यांना उपविजेत्या पदावर समाधान मानावे लागले. त्यांनाही चषक व गॅलक्सी टॅब प्रदान करण्यात आला. या पुरस्कारांचे वितरण व्हीएनआयटीचे अधिष्ठाता डॉ. आर. के. इंगळे, टीसीएसचे उपाध्यक्ष चैतन्य साठे यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्पर्धेचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे क्विझमास्टर पिकब्रेन आणि त्यांच्या गटाने तयार केलेले भारतातील ॲनिमेशनवर आधारित प्रश्नमंजूषाविषयक पहिले सॉफ्टवेअर आहे. या स्पर्धेत विजेत्यांना अंतिम फेरीत राष्ट्रीय स्तरावर नागपूरचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या सहाही गटांना विविध प्रकारची बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धेच्या विभागीय फेऱ्या १४ शहरांमध्ये घेण्यात येत आहेत. या सर्व फेऱ्यांमधील विजेत्यांना टीसीएसचे मुख्य कार्यकारी अधिकारी एन. चंद्रशेखरन यांच्याशी चहापान करत संवाद साधण्याची संधी मिळेल. ■



विजेत्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देताना डॉ. इंगळे व चैतन्य साठे